# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १९०-२३** **दिनांक १४/०६/२०२३**

**सायबर गुन्ह्यात फसवणूक झालेले क्रिप्टोकरन्सी ( 39596USDT- ₮)**
**36,00,000/- Rs. (INR) हे १३ महिन्याचे सातत्यपुर्ण तपासाअंती फिर्यादी यांना परत.**
**<u>सायबर गुन्हे कक्षाची उल्लेखनीय कामगिरी !!!</u>**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत सायबर विषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता गुन्हे शाखा अंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे.

सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार श्री. योगेश कांतीलाल जैन, रा. जे.पी.नॉर्थ, विनय नगर, मिरारोड (पुर्व), ता. जि. ठाणे यांची दिनांक ०४/०५/२०२२ रोजी त्यांचे सोबत क्रिप्टोकरन्सी गुंतवणूकीबाबत फसवणूक झाल्याबाबतची लेखी तक्रार प्राप्त झालेली होती.

सदर तक्रारीमध्ये तक्रारदार श्री. योगेश जैन यांनी नमुद केलेले होते की, त्यांना फेब्रुवारी २०२२ मध्ये 'BTC INDIA GROUP-1' नावाच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडण्यात आले होते, व्हॉट्सॲपच्या एका ॲडमिन नामे ॲमी ने ग्रुप तयार केला होता. तिचा नंबर +852-46849180 (HongKong) असा होता. दिनांक ०८/०२/२०२२ ते दिनांक १४/०५/२०२२ या कालावधीत BTC INDIA GROUP चा व्हॉट्सॲप ग्रुपवरुन ॲडमिन ॲमी यांनी तिच्या मो.क्र. +852- 46849180 वरुन संपर्क करून इन्व्हेस्टमेंट बाबत माहिती देवून BTC कॉईन ट्रेडींग ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. BTC कॉईन ट्रेडींग बाबत सिग्नल देवून नफा कमविण्याचे आमिष दाखवून ट्रेडींग-इन्वेस्टमेंट करण्यास भाग पाडले. त्यावर विश्वास ठेवून तक्रारदार श्री. योगेश यांनी Binance App वरुन 33,65,660/- रुपये खर्च करून क्रिप्टो करन्सी 39,596 USDT खरेदी करून ॲमी हिच्या सांगण्यावरुन http://trade.mpisvip.com मधून BTC कॉईन UUID : 254907380217860096 ॲपमध्ये ट्रान्सफर केले. दिनांक ०४ मे २०२२ रोजीपासून BTC कॉईन ॲप ऑपरेट होत नसल्याचे श्री. योगेश यांचे लक्षात आले. तसेच त्याबाबत त्यांनी ॲमी हिच्याकडे चॅटींगवर विचारणा केली असता कोणतेही उत्तर दिले नाही. व तिचा संपर्क नॉट रिचेबल येत होता. त्यावेळी श्री. योगेश यांचे लक्षात आले की, BTC कॉईन ॲप मध्ये गुंतवणूक केलेल्या रक्कमेची फसवणूक झालेली आहे.

सदर तक्रारीवरुन सायबर गुन्हे कक्ष यांनी तात्काळ तपास सुरु करून फसवणुक झालेली क्रिप्टो करन्सीचा तांत्रीक तपास सुरु केला. तसेच तांत्रीक विश्लेषणानंतर व्यवहार थांबविण्यासाठी तात्काळ संबंधीत Binance व Gate io या क्रिप्टो करन्सी प्लॅटफॉर्म यांचेशी ईमेल/पत्रव्यवहार करण्यात आला. Binance व Gate io यांचेकडुन क्रिप्टोकरन्सी बॅलेन्स बाबत कोणतेही उपयुक्त माहिती प्राप्त झाली नाही. परंतू क्रिप्टोकरन्सी चे ट्रेसिंगचे सविस्तर विश्लेषणावरुन **OKX** (OKX is a global cryptocurrency spot and derivatives exchange) seychelles Country (East Africa) हया प्लॅटफॉर्मवरील १ संशयीत वॉलेट निष्पन्न करण्यात आले. तसेच संबंधित **OKX** क्रिप्टोकरन्सी एक्सचेंजला पत्रव्यवहार करण्यात आला. सदरचे संशयित वॉलेट हे एका चायनीज नागरिकांचे नावाने असल्याचे निष्पन्न झाले.

श्री. योगेश जैन यांचे तक्रारीवरुन सविस्तर प्राथमिक चौकशी पूर्ण करुन सायबर गुन्हे कक्ष यांनी दिलेल्या अहवालावरुन काशिमिरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. २०५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये दिनांक १६/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

श्री. योगेश जैन यांना त्यांची फसवणूक झालेली रक्कम परत मिळण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज करण्याबाबत माहिती देण्यात आली होती. मा. न्यायालयामध्ये सदर प्रकरणामध्ये सायबर गुन्हे कक्षाकडून करण्यात आलेला तपास ग्राह्य ठरला, सदर तपासामध्ये तक्रारदार श्री योगेश जैन यांचेकडून फसवणूक झालेले क्रिप्टोकरन्सी हे चायनीज नागरिकांचे वॉलेट मध्ये जमा झाल्याचे व तक्रारदार यांना संपर्क करणारे सर्व संपर्क क्रमांक हे हॉंगकॉंग देशामधून वापरात येत असल्याचे मा. न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यात आले.

मा. न्यायालयाने सायबर गुन्हे कक्षाचे सविस्तर अहवालावरुन **OKX** ला गोठविलेली वॉलेट मधील ( 39596USDT- ₮) 36,00,000/- Rs. (INR) रुपये मुळ तक्रारदार यांना परत देण्याबाबत सविस्तर आदेश दिले त्याप्रमाणे दिनांक १३/०६/२०२३ रोजी मुळ तक्रारदार यांचे खात्यामध्ये ( 39596USDT- ₮) 36,00,000/- Rs. (INR) परत मिळालेले आहेत.

सायबर गुन्हे कक्ष यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करुन चायना देशामधील नागरिकाने भारतीय नागरिकांची फसवणूक झालेली रक्कम सातत्यपूर्ण १३ महीने तपास करुन फसवणुक झालेली रक्कम तक्रारदार यांना परत मिळवून दिलेली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **(cryptocurrency) मध्ये गुंतवणूकीवर मोठ्या प्रमाणात नफा मिळविता येतो अश्या फसव्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये.**
- **(cryptocurrency) गुंतवणूक करण्यापुर्वी ॲप/एक्सचेंज/प्लॅटफॉर्मबाबत सखोल माहिती प्राप्त केल्याशिवाय गुंतवणूक करू नये.**
- **(cryptocurrency) गुंतवणूकीबाबत नियंत्रण/देखरेख करणारी कोणतीही शिखर संस्था नाही.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की असा फसवणूकीचा प्रकार आपल्या सोबत घडलेला असल्यास तात्काळ नजिकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो.उप.नि. प्रसाद शेनोळकर, पो.अंम. प्रविण आव्हाड यांनी केली आहे.

----oooo----